(९२)

जा.क्र.उमाशि-३/११ वी प्रवेश/पुवि/२०१३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक :

प्रति

प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, पुणे
नेस वाडिया कॉलेज पुणे १

विषय : इयत्ता ११ वी केंद्रिय प्रवेश सन २०१३-१४
प्रवेश अर्जातील माहिती अद्ययावत करणेबाबत.

संदर्भ :- १) दिनांक ९/१/२०१३ च्या प्रवेश समिती बैठक.
२) दिनांक २६/२/२०१३ ची कार्यकारी समिती बैठक.

पुणे शहर व पिंपरी चिंचवड परिसरातील उच्च माध्यमिक /कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी वर्गातील प्रवेश केंद्रिय प्रवेश समितीकडून केंद्रीय पध्दतीने गेली १८ वर्षे निश्चित केले जातात हे आपणास विदित आहेच. गतवर्षी प्रमाणेच शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील इ. ११ वी चे प्रवेश केंद्रीय प्रवेश पध्दतीने होणार आहेत.

इयत्ता ११ वी वर्गातील प्रवेश अचूक, कमीत कमी वेळेत व सुलभ होण्यासाठी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी चे शाखानिहाय मंजूर वर्ग /तुकडया त्यामधील विद्यार्थी, प्रवेश क्षमता, अनुदानित/ कायम विना अनुदानित, मंजूर तुकडीसाठी निवडलेले वैकल्पिक विषय इत्यादी माहिती अचूक असणे अत्यंत महत्वाचे आंहे. त्यासाठी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये खाली दिलेल्या सुचंना लक्षात घेवून देण्यात यावी.

१. माहिती भरण्यासाठी निळया शाईचा वापर करावा.
२. कनिष्ठ महाविद्यालयाचा पूर्ण पत्ता पिनकोडसह लिहावा.
३. कनिष्ठ महाविद्यालयाच्या इ. ११ वी शाखा निहाय मंजूर वर्ग तुकडया विषय यानुसार एकूण प्रवेश क्षमता स्पष्ट दयावी.
४. कनिष्ठ महाविद्यालयात चालू असलेल्या मान्यताप्राप्त अनुदानित व कायम विनाअनुदानित तुकडयांची संख्या नमूद करावी.
५. एखादा विषय बंद करण्यात आलेला असेल त्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
६. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात एखादी शाखा तुकडी बंद केली असल्यास प्रपत्रात त्या शाखेच्या समोर तसे नमूद करणे अत्यंत आवश्यक आहे.
७. प्रपत्रातील सर्व माहिती भरणे आवश्यक आहे.

८. ज्या ठिकाणची माहिती आवश्यक आहे त्या ठिकाणी √ अशी खूण करावी आणि ज्या ठिकाणची माहिती लागू नसल्यास **X** अशी खूण करावी .

९. संस्था अल्पसंख्यांक असल्यास शासनाने मान्यता दिलेल्या प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक स्पष्ट नमूद करावा व सोबत सदर प्रमाणपत्राची साक्षांकित सत्यप्रत जोडावी .

१०. कायम विनाअनुदानित शाखा तुकडया विषय संदर्भात फी चा तपशील स्पष्ट लिहिण्यात यावा.

११. अचुक माहिती नसल्यास किंवा अपूर्ण माहिती लिहिलेली प्रपत्र असल्यास त्यामुळे निर्माण होणा-या समस्यांची जबाबदारी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.

१२. कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रपत्राच्या शेवटी कॉलेजच्या प्राचार्यांनी स्वाक्षरी करणे अत्यंत आवश्यक आहे. करिता म्हणून स्वाक्षरी केलेली प्रपत्रे स्विकारली जाणार नाहीत व ग्राहय धरली जाणार नाही.

१३. प्रपत्र सादर करताना त्याची घडी करु नये.

१४. माहिती दोन प्रतीत सादर करावी.

उपरोक्त सर्व सूचनांप्रमाणे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचे माहिती पत्र भरुन दिनांक २२/३/२०१२ पर्यंत किंवा त्यापूर्वी उपप्राचार्या श्रीमती खानविलकर, आबासाहेब गरवारे कनिष्ठ महाविद्यालय कर्वे रोड, पुणे यांचेकडे सूपूर्त करुन प्रपत्र दिल्याची पोहोच घ्यावी. सदर परिपत्रक या कार्यालयाच्या (**www.dydepune.com**) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

% सोबत - विहित नमूना फॉर्म

(बाळासाहेब ओहाळ)
सचिव
इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती
तथा
सहाय्यक शिक्षण संचालक,
पुणे विभाग, पुणे

प्रत - माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
प्राचार्य, आबासाहेब गरवारे महाविद्यालय कर्वेरोड, पुणे ४

उपप्राचार्या, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे ४
२/- कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त माहिती संकलित करावी व प्रवेश अर्ज शाखानिहाय अद्यायावत करावेत.

सर्व केंद्रिय प्रवेश समिती सदस्य
श्री / श्रीमती . . . . . . . . . . . . . . . . . . . .

# शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे

## इ. ११ वी केंद्रीय प्रवेश सन २०१३-१४

### कनिष्ठ महाविद्यालय माहिती प्रपत्र

१ उच्च माध्यमिक /कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव :- फोन क्रं.

२ उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयाचा पत्ता:- ई - मेल :-

३ मुख्याध्यापक /प्राचार्यांचे नांव व ई मेल:-

४ मुख्याध्यापक /प्राचार्यांचा मोबाईल :-

५ उच्च माध्यमिक /क.म.वि. इ. ११ वी प्रवेश काम करणारी व्यक्ती नांव :- / पदनाम /मोबाईल क्रं.

६ संलग्नता प्रकार :-(१)माध्यमिक विद्यालय संलग्न (२) वरिष्ठ महाविद्यालय संलग्न (३)स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय :-

७ महाविद्यालयाचा प्रकार :- (१) फक्त मुले (२) फक्त मुली (३) मुले आणि मुली

८ वसतिगृहाची सोय आहे किंवा नाही, असल्यास इयत्ता ११ वी प्रवेश क्षमता :- मुले :- मुली :-

९ संस्था अल्पसंख्यांक :- आहे / नाही प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक :-

१० उच्च माध्य /कनिष्ठ महाविद्यालयाचा फी चा तपशील

| | कला | वाणिज्य | विज्ञान | संयुक्त |
|---|---|---|---|---|
| अनुदानित | | | | |
| कायम विना अनुदानित | | | | |

| | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | शाखा / इयत्ता | कला ११ वी | | | | विज्ञान ११ वी | | | | वाणिज्य ११ वी | | | | संयुक्त ११ वी | | | | |
| १२ | अनुदानित /कायम विना अनुदानित | अनुदानित | | कायम विनाअनुदानित | | अनुदानित | | कायम विनाअनुदानित | | अनुदानित | | कायम विनाअनुदानित | | अनुदानित | | कायम विनाअनुदानित | | |
| १३ | अध्यापनाचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी | इंग्रजी | मराठी | इंग्रजी | मराठी | इंग्रजी | मराठी | इंग्रजी | मराठी | इंग्रजी | मराठी | इंग्रजी | मराठी | इंग्रजी | |
| १४ | शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मधील प्रवेश अर्जातील कोड क्रमांक | | | | | | | | | | | | | | | | | |
| १५ | तुकडी संख्या | | | | | | | | | | | | | | | | | |
| १६ | प्रवेश क्षमता एकूण | | | | | | | | | | | | | | | | | |
| १७ | अ) अनिवार्य विषय | इंग्रजी | पर्यावरण | शा.शि. | | इंग्रजी पर्यावरण शा.शि. रसायनशास्त्र भौतिकशास्त्र | | | | इंग्रजी | पर्यावरण | शा.शि. | | इंग्रजी | पर्यावरण | शा.शि. | | |
| | ब) द्वितीय भाषा विषय | | | | | | | | | | | | | | | | | |
| | क) शाखानिहाय निवडलेले व मान्यता असलेले वैकल्पिक विषय | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | द्विलक्षी बाबत विषयनिहाय माहिती | विषय | मेक. मेन्टनन्स | | कॉम्प्युटर सायन्स | | इलेक्ट्रॉनिक्स | | इलेक्ट्रिकल मेन्ट. | | एसएमएस रिपेअर | | जनरल सिव्हील इंजि. | |
| | | तुकडी प्रकार | अनुदानित | का.वि.अनु | अनुदानित | का.वि.अनु | अनुदानित | का.वि.अनु | अनुदानित | का.वि.अनु | अनुदानित | का.वि.अनु | अनुदानित | का.वि.अनु |
| | | मंजूर विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | | | |
| | | फी तपशील | | | | | | | | | | | | |

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे आमच्या उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयाची प्रपत्रात नमूद केलेली माहिती ही अचूक व वस्तुनिष्ठ असून शासनाने मान्यता दिलेल्या शाखा /तुकडया व त्यामधील प्रवेशक्षमता नमूद केलेली आहे. माहितीमध्ये काही तफावत अथवा काही चूक निदर्शनास आल्यास व त्यामुळे केंद्रिय प्रवेश प्रक्रियेत व भविष्यात काही अडचणी निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील हे मला ज्ञात आहे. वर नमूद केलेले वर्ग तुकडया,शाखा, माध्यम व विषय सन २०१३-१४ करीता अनुदानित / कायम विना अनुदानित तत्वावर चालू ठेवण्यात येतील.

दिनांक :-

प्राचार्य /मुख्याध्यापक स्वाक्षरी :-

प्राचार्य /मुख्याध्यापक नांव :-

शिक्का :-